# 'द न्यूज बिज टाईम्स'

thenewzbiz@com ८/०८/२०२५, पिंपरी, महाराष्ट्र, संपर्क : ९७६६९५२११४ thenewzbiz@gmail.com वर्ष - दुसरे डिजीटल आवृती






## अण्णासाहेब मगर महाविद्यालयाचा सायबर सुरक्षा जनजागृती उपक्रम कौतुकास्पद : कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी

**पुणे, प्रतिनिधी** : सध्या डिजिटल नेटवर्किंग आणि सुविधांचा वापर वाढला असून, डिजिटल व्यवहारांमधील गैरप्रकारांचे प्रमाणही वाढत आहे. त्यामुळे सायबर सुरक्षा ही काळाची गरज बनली आहे. फसवणुकी बरोबरच सायबर हल्ल्यांमुळे समाजाचे मोठे नुकसान होऊ शकते. त्यामुळे आपली माहिती आणि प्रणाली सुरक्षित ठेवण्यासाठी सायबर सुरक्षा आवश्यक आहे.त्या दृष्टीने अण्णासाहेब मगर महाविद्यालयाचा सायबर सुरक्षा जनजागृती उपक्रम कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.सुरेश गोसावी यांनी काढले.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या संगणकशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात क्विक हिल फाउंडेशनच्या सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षण या उपक्रमाच्या माध्यमातून सायबर सुरक्षेविषयी जनजागृतीसाठी विशेष उपक्रमाचे आयोजन केले होते. या प्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) सुरेश गोसावी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

याप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पराग काळकर, अण्णासाहेब मगर महाविद्यालयाचे प्राचार्य व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. नितीन घोरपडे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे, प्रा. डॉ. धोंडीराम पवार, प्रा. संदीप पालवे, डॉ. राजेंद्र विखे पाटील, बागेश्री मंठाळकर, सागर वैद्य, प्रा. डॉ. संगीता जगताप, डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, प्रा. डॉ. ज्योती भाकरे, सीएमए डॉ. चारुशीला गायके व प्रा. डॉ.प्रभाकर देसाई, उपप्राचार्य, डॉ. प्रशांत मुळे, डॉ. विलास वाणी, प्रा. मनीषा गाडेकर यांच्यासह महाविद्यालयाचे सायबर वॉरियर क्लबचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांनी आज प्रत्येकजण स्मार्टफोन आणि इंटरनेटचा वापर करत आहे, त्यामुळे सायबर गुन्हेगारांचे धोकेही वाढले आहेत. या धोक्यांपासून स्वतः चे संरक्षण कसे करावे, हे प्रत्येकाला माहित असणे आवश्यक असल्याचे सांगितले.

महाविद्यालयाच्या 'सायबर वॉरियर' टीमने आकर्षक सादरीकरण केले. त्यांनी फिशिंग, रॅन्समवेअर, ऑनलाइन फसवणूक आणि सोशल मीडियावरील धोके यांसारख्या विविध सायबर गुन्ह्यांची माहिती दिली. तसेच, पासवर्ड सुरक्षित ठेवणे, अज्ञात लिंकवर क्लिक न करणे, आणि पब्लिक वाय-फायचा वापर करताना काळजी घेणे यांसारख्या प्रतिबंधात्मक उपायांवरही त्यांनी प्रकाश टाकला. या टीमने उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांचे तसेच मुख्य कार्यरत असलेल्या व्यक्तींचे शंकांचे निरसन केले आणि त्यांना प्रात्यक्षिकांद्वारे सुरक्षिततेच्या युक्त्या समजावून सांगितल्या. प्रास्ताविक प्रा.मनीषा गाडेकर, सूत्रसंचालन डॉ. विलास वाणी यांनी, तर डॉ. प्रशांत मुळे यांनी आभार मानले.

## विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी भावनिक बुद्धिमत्ता महत्त्वाची : कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी

**अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्यावतीने आयोजित 'अध्ययन व अध्यापनातील भावनिक बुद्धिमत्तेचे उपयोजन' या शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप**

**पुणे, प्रतिनिधी** : विचार आणि भावना यांचा एकत्रित मेळ घालतो. भावनिक बुद्धिमत्तेचा उपयोग करत असतो. यात स्वतः च्या आणि इतरांच्या भावनांची जाणीव ठेवून भावनांचे व्यवस्थापन करत असतो. अध्ययन अध्यापनात विद्यार्थ्यांशी चांगल्या प्रकारचे भावनिक नाते सबंध प्रस्थापित करण्यासाठी उपयोग होईल. यशस्वी करिअरसाठी तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी भावनिक बुद्धिमत्ता हा विषय महत्त्वाचा आहे. सावित्रीबाई फुले विद्यापीठ नेहमी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण नाविन्यपूर्ण उपक्रम घेऊन समजापर्यंत पोहोचत असते, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांनी केले.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्यावतीने उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचा करिअर कट्टा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजना, विद्यापीठ अनुदान आयोगाचे मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने अध्ययन व अध्यापनातील भावनिक बुद्धिमत्तेचे उपयोजन (इमोशनल एंटिलेजन्स इन टिचिंग अँड लर्निंग) या विषयावर दहा दिवसांच्या ऑनलाइन शिक्षक विकास कार्यक्रमाचे (फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम) आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या प्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रमोद पाटील, पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव ॲड. संदीप कदम, खजिनदार ॲड. मोहनराव देशमुख, उपसचिव एल. एम. पवार, सहसचिव ए. एम. जाधव, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र अध्यक्ष यशवंत शितोळे, विद्यापीठ अनुदान आयोगाचे मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. सुभाष केंद्रे, महाविद्यालयाचे प्राचार्य व सावित्रीबाई पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. नितीन घोरपडे, विषय तज्ज्ञ मिथिला दळवी, मिलिंद पळसुले, एफडीपी समन्वयक डॉ. लतेश निकम आदी उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांनी केले. त्यांनी गेली दहा दिवस सुरू असलेल्या अध्ययन व अध्यापनातील भावनिक बुद्धिमत्तेचे उपयोजन शिक्षक विकास कार्यक्रमाचा आढावा घेतला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रमोद पाटील यांनी शिक्षण क्षेत्रात भावनिक बुद्धिमत्ते निकडीचा विषय असून विद्यार्थांच्या समस्या, प्रश्न समजून घेऊन त्यांच्या विकासासाठी भावनिक बुद्धिमत्तेचा अवलंब करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

उपप्राचार्य डॉ. प्रशांत मुळे, डॉ. शुभांगी औटी, डॉ. लतेश निकम,डॉ. रवींद्र मेने, डॉ. दत्तात्रय संकपाळ,डॉ. सविता कुलकर्णी, डॉ. नीता कांबळे, डॉ. शुभांगी शिंदे, प्रा.ए. एन. कांबळे, प्रा. शैला धोत्रे, प्रा. किरण रणदिवे, प्रा. शशिकला वाल्मिकी, डॉ. सुजाता टापरे, डॉ. शरद गिरमकर, प्रा. अनुराधा कांबळे, डॉ. विलास वाणी, यांनी या कोर्सचे संयोजन केले.

या कोर्सला महाराष्ट्र व गुजरातमधून ७२४ शिक्षक सहभागी झालेत. सूत्रसंचालन डॉ. शुभांगी शिंदे यांनी केले. पाहुण्यांच्या परिचय डॉ. सविता कुलकर्णी व डॉ. प्रशांत मुळे यांनी करून दिला, तर आभार डॉ. लतेश निकम यांनी मानले.




